प्रकरण सहावे

# 'महात्मा' मधील भाषाशैली

प्रकरण सहावे

# ' महात्मा ' मधील भाषाशैली

## ६.१ प्रास्ताविक :

कथानक, व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती व भाषाशैली ह्या चार प्रमुख घटकांचा विशेष आधार घेऊनच कादंबरी उभी केली जाते. ह्यातील चौथा प्रमुख घटक भाषाशैली ह्याचा विचार आपल्याला ह्या प्रकरणात करावयाचा आहे. म्हणजेच कादंबरीकाराने कादंबरीचे निवेदन करण्यासाठी वापरलेली भाषा व कादंबरीकाराने कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या तोंडचे संवाद देण्यासाठी वापरलेली भाषा ह्यांचा विचार येथे अभिप्रेत आहे.

आपल्या मनातील विचार व भावना व्यक्त करण्याचे साधन म्हणजे भाषा होय. भाषा वापरण्याची विशिष्ट पध्दत म्हणजे भाषाशैली होय. जसा व्यक्तीचा पिंड असेल, तशी त्या व्यक्तीची भाषाशैली असते. भाषाशैली व व्यक्तिमत्त्व एकमेकाशी संलग्न असेच आहेत. कादंबरीची भाषा अनुभवातून प्रत्ययाला आलेली असते व त्यातून तिला एक शैली प्राप्त झालेली असते. रंजनप्रधान कादंबऱ्यांमध्ये स्वप्नांच्या दुनियेत घेऊन जाणारी आलंकारिक भाषा आपणास दिसते. मात्र चरित्रात्मक कादंबरी लिहीत असताना म्हणजेच चरित्रनायकाचे चरित्र कादंबरीच्या रूपाने मांडत असताना अशी आलंकारिक किंवा स्वप्नमय भाषा वापरून चालत नाही, तर ती विविध प्रसंगांना, तसेच विविध व्यक्तींच्या स्वभावाला अनुरूप अशीच असावी लागते. तसे झाल्यासच ती जिवंत वाटते. अन्यथा ती त्या कादंबरीला योग्य अशी भाषाशैली वाटत नाही.

'महात्मा' ह्या कादंबरीत आलेली निवेदनशैली सहज व ओघवती आहे. तसेच व्यक्तीनुसार ती बदलणारीही आहे. म.फुले ह्यांची स्वत:ची भाषाशैली (वेगवेगळ्या प्रसंगी बदलणारी, कधी कठोर, तर कधी हळवी, मृदू अशी), तसेच सावित्रीबाई, गोविंदराव फुले,

म.फुले ह्यांचे सहकारी अशा सर्व व्यक्तिरेखांच्या तोंडची भाषाशैली ह्या सर्व गोष्टींचा तपशीलवार अभ्यास आपल्याला ह्या प्रकरणात करावयाचा आहे. प्रथम कादंबरीकाराची निवेदनाची भाषा जाणून घेऊ.

## ६.२ कादंबरीकाराची निवेदनाची भाषा :

कादंबरीकाराची निवेदनाची भाषा ओघवती व सहजसुंदर अशी आहे. ती तृतीयपुरुषी आहे व प्रमाण मराठीत आहे. म.फुले ह्यांचे समाजाविषयीचे सूक्ष्म निरीक्षण व आंतरिक तळमळीतून भाषेचा व बोलीचा, त्यांनी केलेल्या सामाजिक सुधारणांचा, तसेच त्यांच्या विनयशीलतेचा, बंडखोरपणाचा, अन्यायास प्रतिकार करणाऱ्या मानसिक बदलाच्या वेळच्या भाषेचा, प्रसंगी संवेदनशील झालेल्या अशा सर्व भाषाशैलीचा कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांनी अभ्यास केलेला दिसतो. शिवाय त्यांची स्वत:ची एक निवेदनपध्दती आपणास दिसून येते. म. फुल्यांसारख्या महामानवाचे चरित्र कादंबरीच्या रूपाने मांडताना त्यांनी ते अत्यंत सहज, सुंदर व सोप्या निवेदनशैलीने मांडले आहे. सत्यता व सर्जनशीलता ह्यांचे भान ठेवूनच चरित्रात्मक कादंबरी ही निर्माण केलेली असते. ती चरित्रही असते, तसेच ती कादंबरीही असते. 'महात्मा' ही चरित्रात्मक कादंबरी म.फुल्यांचा जीवनाचा विकासक्रम चित्रित करीतकरीतच रवींद्र ठाकूर ह्यांनी सहज सुंदर अशा भाषाशैलीने नटवलेली आहे. कादंबरीला सुरुवात होते तीच मुळी पुढील सहज अशा वाक्यरचनेने :

> ''शाळा सुटण्याची घंटा झाली. जोती वर्गातून बाहेर पडला. रस्त्यावर शुकशुकाट होता. फ्री चर्च मिशनमधील विद्यार्थी अजून बाहेर पडले नव्हते. आकाशात शिरलेल्या सेंट मेरी चर्चच्या टॉवरच्या मिशनरी धर्मशाळेजवळ आणि भव्य प्रार्थनास्थळाजवळ त्याचे पाय रेंगाळले नाहीत. झपाझप पाय उचलत तो चालत राहिला ......''[१]

अशा प्रकारे ठाकूर ह्यांनी साधी, पण प्रसंगनिष्ठ भाषा वापरून कादंबरीतील वातावरण रमणीय केले आहे. तो प्रसंग आत्ताच आपल्यासमोर घडतो आहे, असेच आपल्याला वाटत राहते. अशा ह्या सहज निवेदनशैलीमुळे ही कादंबरी वाचनीय झाली आहे.

कादंबरीत असे अनेक प्रसंग आहेत की, ज्या प्रसंगामुळे आपण त्या वातावरणात वावरत आहोत, असाच भास होत राहतो. पुढील एक प्रसंग पाहा :

‘‘दिवेलागण झाली. सावित्रीनं सगळं घर उजळून टाकलं. शून्यात नजर लावून बसलेला जोती आज जेवायलाही उठला नाही. राजाराम जेवण घेऊन मळ्याकडे निघून गेला. आऊच्या आग्रहाखातर दादांनी दोन घास खाल्ले आणि ते अंथरुणावर जाऊन पडले.’’[२]

अशा प्रकारे कादंबरीकार ठाकूर वाचकाला त्या त्या प्रसंगात सामावून घेत कादंबरीचे निवेदन करतात. त्यामुळे कादंबरी हातात घेतल्यानंतर ती पुढे-पुढेच वाचत राहावे, असे वाचकाला वाटते. पानामागून पाने कधी उलटली जातात, हेही त्याला समजत नाही. ही कादंबरी इतर चरित्रात्मक कादंबऱ्यांपेक्षा नावीन्यपूर्ण वाटत राहण्यामागे हे एक कारण आहे. कादंबरीत असे कोठेही वातावरण नाही की, ज्यामुळे वाचकाला ती रुक्ष किंवा कंटाळवाणी वाटत राहावी. कादंबरीकार रवींद्र ठाकूर ह्यांच्या धारदार निवेदनशैलीमुळे कादंबरीनायकाचे विचार वाचकांच्या मनात सहजच पोहोचतात. कादंबरीत म.फुले ह्यांच्यावर धाडण्यात आलेल्या मारेकऱ्यांच्य प्रसंगाचे वर्णन सहज भाषाशैली वापरून कादंबरीकाराने केले आहे. हा प्रसंग वाचताना अंगावर शहारे उभे राहतात. हा प्रसंग कादंबरीकाराने जणू जवळूनच पाहिला आहे, असे आपल्याला वाटत राहते. कारण तो त्याने जसाच्या तसा कादंबरीत उभा केला आहे. पाहा :

‘‘एक आकृती समईच्या दिशेनं पुढं सरकली आणि ताडकन उठून जोतीरावांनी दांडपट्याला हात घातला.

''कोण-कोण ते ?'' जोतिरावांनी दरडावलं.

उत्तर मिळालं नाही.

समईच्या दिशेनं सरकलेली आकृती सावधपणे मागे सरकली.

त्या अंधुक उजेडात फरशी कुऱ्हाड चमकली. मस फासलेली ती काळी तोंडं भयंकर वाटत होती.

''कोण तुम्ही ? काय पाहिजे तुम्हाला ?

दचकून उठलेल्या सावित्रीबाई भिऊन जोतीरावांना बिलगल्या.

''तुजा जीव''[३]

अशा प्रकारे प्रसंगनिष्ठ वर्णन करून कादंबरीकाराने 'महात्मा' ही कादंबरी वेगळी, तसेच वैशिष्ट्यपूर्ण बनवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. हीच सहज व ओघवती निवेदनशैली 'महात्मा' ह्या कादंबरीचा महत्त्वाचा पैलू ठरली आहे. रुक्ष, विचारजड, भरकटत जाणारी भाषा नसल्यामुळे सहजच वाचक ह्या कादंबरीच्या वातावरणात रममाण होतो व म.फुले ह्यांचे विचार सहजपणे वाचकांच्या मनावर बिंबतात. कादंबरीकाराने कादंबरीनायक म.फुले ह्यांच्या भाषेचाही बारकाईने अभ्यास केला आहे. म्हणूनच ते इतक्या सहजतेने भाषाशैली वापरताना दिसतात.

## ६.३ व्यक्तिरेखांच्या तोंडी असलेल्या संवादाची भाषा :

कादंबरीकार कादंबरी नावीन्यपूर्ण होण्यासाठी आपली वैशिष्टयपूर्ण निवेदनशैली वापरलेली आहेच, पण त्याचबरोबर कादंबरीतील व्यक्तिरेखांच्या भाषाशैलीचाही बारकाईने अभ्यास करून ती व्यक्तिरेखा आपल्यासमोर जशीच्या तशी उभी करण्याचे कौशल्यही साधलेले आहे ह्याचे कारण म्हणजे व्यक्तिरेखांच्या तोंडी असलेली भाषा. कादंबरीत अनेक व्यक्तिरेखा आहेत. परंतु आपल्याला येथे काही महत्त्वाच्या व्यक्तिरेखांच्या तोंडी असलेल्या संवादांचाच विचार करावयाचा आहे. ह्या कादंबरीतील सर्वात महत्त्वाची व प्रमुख व्यक्तिरेखा

म्हणजे म.जोतिराव फुले ह्यांनी कशा प्रकारची भाषा वापरली आहे, ह्याचा विचार आपण प्रथम करू.

### ६.३.१ म.फुले ह्यांच्या तोंडचे संवाद :

रोखठोक, प्रसंगी बंडखोर अशा स्वरूपाची भाषा आपल्याला 'महात्मा' ह्या कादंबरीतून दिसून येते. एकूणच कादंबरी वाचल्यांनतर आपल्या हेही लक्षात येते की, कादंबरीकाराची भाषा धारदार, परखड आणि स्पष्ट आहे. बंडखोर चरित्रनायक त्यातून चांगल्या प्रकारे व्यक्त झाला आहे. चरित्रनायक म.फुले हेच आपल्यासमोर बोलत आहेत, असे वाचकाला वाटत राहते. म. जोतीराव फुले ह्यांचा लहान वयात अपमान होतो, तेव्हा त्यांचे मन तडफडून उठते. अपमानाला प्रतिकार केला पाहिजे, असेच त्यांचे मन म्हणत असते. त्यांचे हे मन कादंबरीकाराने पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे :

"वरातीच्या घोड्याचा, एका पशूचा त्यांना विटाळ होत नाही. माणसांचा मात्र विटाळ होतो. हा त्यांचा धर्म - ? हा त्यांचा आचार - ?"[४]

तत्कालीन परिस्थिती अशी काही होती की, अन्याय केला, अन्याय झाला, असे म्हणण्याससुध्दा कुणाची जीभ रेटत नव्हती. म.फुले ह्यांनी मात्र त्याकाळीसुध्दा अन्याय करणाऱ्यांवर ताशेरे ओढले होते. ते म्हणतात,

"ह --हत्तीच्या पायी दिलं असतं !" दाणकन् पाय आपटून जोती गरजला. "त्यांचा आणि माझा धर्म एकच आहे. ते हिंदू आहेत, तसा मीही हिंदू आहे. मग मी हीन कसा ? मीही एक माणूसच आहे ना ? कशाच्या आधारावर ते मला हीन समजतात ? कशासाठी मी हा जुलूम सहन करायचा ?"[५]

प्रथमच एक शूद्राचा मुलगा अशा प्रकारे अन्याय-अपमान ह्यांच्य विरोधात आपले बंडखोर मन व्यक्त करीत होता. तो म्हणतो,

"मी अडवणार ! त्यांच्या जुलमांचे पाढे मी वाचणार. त्यांनी आमच्यावर लादलेली गुलामगिरी मी झुगारून देणार ।"[६]

अंगार भरल्याप्रमाणे त्याचे हे शब्द आहेत. फक्त एकट्याचाच तो विचार करीत नाही, तर आपल्याबरोबर आपल्यासारख्याच अन्याय झालेल्या लोकांच्या अन्यायाविरुध्द आवाज उठविण्याचेही धाडस तो दाखवतो. तो म्हणतो, "आज त्यांची ती पेशवाई नाही, दादा. हा जुलूम मी सहन करणार नाही. जे करत आहेत, त्यांनाही सहन करून देणार नाही."[७]

म. फुले ह्यांना ब्राह्मणी कावा चांगला माहीत होता. त्यामुळे त्यांनी त्यांच्याविरुध्द वागताना, बोलताना कधीच भाड राखली नाही. स्पष्टवक्तेपणा हा त्यांच्य व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग आहे, हेही आपल्याला कादंबरीतून दिसून येते. ते स्पष्टच म्हणतात,

"मतलबावर डोळा ठेवून त्यांनी धर्मग्रंथ रचले आहेत. तुम्ही राज्यकर्ते म्हणजे राजे आणि राजा हा विष्णूचा अंश असतो, असा शास्त्रार्थ सांगून ते तुमचा विटाळ करतात आणि घरी गेल्यावर आधी अंघोळ करतात."[८]

सत्य आणि स्पष्ट बोलणारे म.फुले ही अशी प्रथम व्यक्ती असेल की, जिने वर्णवर्चस्व प्राप्त झालेल्य लोकांविरुध्द आवाज उठविला होता.

'महात्मा' ही म. जोतीराव फुले ह्यांची चरित्रकहाणी वाचत असताना सहजच आपण एकोणिसाव्या शतकात मागे जातो. 'महात्मा' ही कादंबरी म्हणजे एक वैचारिक गाभाच आहे. विचारप्रवृत्त करायला लावणारी, तरीही रुक्ष न झालेली, वाचतावाचता अंतर्मुख करणारी ही कादंबरी आहे. ह्या कादंबरीतील चरित्रनायक म. फुले ऊर्फ तात्या व इतर व्यक्तिरेखा ह्यांच्या तोंडी जी भाषा आहे, तिच्यामुळे ती व्यक्तिरेखा तिच्या स्वभावासह वाचकांसमोर उभी राहू शकलेली आहे.

चरित्रनायक हा चार चौघांसारखाच माणूस होता. परंतु स्वत:ची एक वेगळी ओळख तो सर्व जगाला दाखवून गेला. त्याच्या वैचारिक उंचीमुळे त्याला हे साध्य झाले. त्याची वैचारिक उंची पुढील उद्‌गारांमधून जाणवते :

''तुम्ही काहीही केलं, तरी ते नावं ठेवणारच आहेत, सदाशिव. कंपनी सरकारची राजवट आज ना उद्या जाणारच आहे. तेव्हा त्यांचं राज्य आहे, तोवर आपण समाजाला भटशाहीच्या जोखडातून सोडवू या अज्ञानी लोकांना नागवून खाणारी ही ऐदी भटशाही हाच खरा शत्रू आहे''[९]

कोणतेही कार्य करताना म.फुले ह्यांनी स्वत:पासून सुरुवात केली होती. सावित्रीबाईंपासून मूल होत नाही, म्हणून दुसरे लग्न करण्याचा आग्रह घरचे लोक करतात. त्यावेळी म.फुले उत्तरादाखल म्हणतात,

''मूल नसलेल्या जोडप्याला स्त्रीनं 'मी दुसरा नवरा करणार आहे', असे म्हटलं, तर तिच्या नवऱ्याला काय वाटेल ? त्याला तो अपमान वाटणार नाही का ? त्याप्रमाणे पुरुषानंही दुसऱ्या लग्नाचा विचार करताना पत्नीला काय वाटेल, याचा विचार करायला नको का ?

ज्या कारणानं नवऱ्याला दुसरं लग्न करायची मोकळीक असेल, त्याच कारणानं ती स्त्रीलाही असली पाहिजे.''[१०]

अशा स्वरूपाची त्यांची भाषा रोखठोक, थोडीशी कटू, पण सत्यता प्रकट करणारी अशी होती. त्या काळातील समाजव्यवस्था, तत्कालीन रूढी, परंपरा, वर्णवर्चस्वता, धार्मिक कर्मकांड, जातीयता, विषमता ह्याविरूध्द बोलण्याचे धाडस म.फुले ह्यांनी दाखवले. ते म्हणतात, ''आम्हाला चार पायाच्या पशूपेक्षा हीन समजून स्वत:मात्र इंग्रजाचे बूट चाटणारे आमचे स्वकीय कसे होऊ शकतात ? यांना आणि त्यांच्या पूर्वजांना स्वदेशाभिमान खरोखर ठाऊक असता, तर त्यांनी आपल्याच देशबांधवांना हीन मानण्याजोगे लेख करून ठेवलेच

नसते. ते विष्ठा खाणाऱ्या पशूचं मूत्र पिऊन पवित्र होतात. परंतु शूद्राच्या हातचं पाणी अपवित्र मानतात. कावेबाजपणा रक्तात भिनलेली ही माणसं स्वार्थासाठी कुठल्याही थराला जातात, नोकऱ्यांसाठी इंग्रजांचे पाय चाटतात आणि आम्ही शिक्षण मागायला गेलो. न्याय मागायला गेलो, तर आम्हाला मात्र स्वकीयद्रोही ठरवतात.....''[११]

अत्यंत वैचारिक गाभा असलेली ही भाषाशैली आहे. कादंबरीकारानेही ती ठाशीवपणे जिथल्या तिथे मांडल्यामुळे कादंबरीला एक वैचारिकता प्राप्त झालेली आहे.

एखादी व्यक्ती कितीही विचारवंत, परखड, बंडखोर, महनीय असली; तरी शेवटी तिलाही मन असते, भावना असतात. त्या व्यक्तीला आपले असे कुणी तरी असते. ज्याच्यापुढे नतमस्तक व्हावे, असेही कोणीतरी असते. त्यावेळेस किंवा आपल्यावर आलेल्या कठीण प्रसंगी त्यांची भाषा मृदू, हळवी झालेली दिसते. म.फुले ह्यांच्याही बाबतीत असेच झाले होते. तेही संवेदनशील मनाचे होते, हाळवे होते. म्हणूनच त्यांना दु:ख समजले हाते, दु:खाची कल्पना आली होती, नात्याची जाण होती. जेव्हा म.फुले ह्यांनी घर सोडले, तेव्हा दादांचा निरोप घेताना ते म्हणतात, ''तुम्ही काही मनात आणू नका, दादा मी कुठेही असलो, तरी नातं तुटणार का आहे ?''[१२]

अशा प्रकारची मनाला चटका लावणारी भाषा वापरून कादंबरीकाराने म.फुले व त्यांचे वडील ह्यांच्यामधील अतूट नाते दाखविले आहे, त्यांच्या भाषाशैलीची छटाही व्यक्त केली आहे. शिवाय करुणरस निर्माण केला आहे, असाच करुणरस म.फुल्यांच्या निधनाप्रसंगीच्या संवादातून निर्माण झालेला आहे. म.फुले आता जगाचा निरोप घेणार आहेत, हे वाचकांच्या लक्षात येते व त्यांच्या नकळत त्यांच्या डोळ्यात पाणी उभे राहते. म.फुले ह्यांच्या शेवटच्या क्षणी त्यांनी सर्वांना निरोप पाठवून बोलावून घेतले होते. सावित्रीबाईंना ते आधार देत होते. यशवंताला ते म्हणतात, ''बाळा, आईला कधीही अंतर

देऊ नकोस''[१३] त्यांनी सावित्रीबाईंना, घरातील सर्वांनाच रडू नका, असे खुणेनेच सांगितले. अशा प्रसंगी झालेली त्यांची मृदू भाषा वाचकांचे मन हेलावून टाकते.

म.फुले ह्यांनी विविध लोकांना पत्रे लिहिली होती. त्यातून प्रत्येक वेळेस त्यांची भाषा बदललेली दिसते. साधी, सोपी स्वतंत्र प्रज्ञेचा अविष्कार असलेली परखड, परंतु सत्य असलेली त्यांची भाषाशैली त्यांच्या वाङ्मयनिर्मितीतून दिसून येतेच. पण त्यांची म्हणून स्वत:ची अशी पत्राची भाषा कशी होती, हे त्यांच्या पत्रांमधून लक्षात येते. शाळेच्या खर्चासाठी सरकारला मदत मागण्यासाठी पाठविलेल्या पत्रातील भाषा नम्रतेची व आशावाद व्यक्त करणारी आढळते. पत्राच्या सुरुवातीला 'मेहरबान', शेवटी 'आपला सेवक' , तसेच 'आपला' हा शब्द वापरून पत्राची सांगता करण्याची पध्दत, ताजा कलम घालण्याची लकब ही सर्व वैशिष्ट्ये त्यांच्या पत्रांमधील भाषेची दिसून येतात.

### ६.३.२ सावित्रीबाईंच्या तोंडचे संवाद :

कादंबरीकाराने म. फुले ह्यांच्या भाषाशैलीबरोबरच सावित्रीबाईंच्या भाषाशैलीचाही विचार केलेला आहे. एक स्त्री कशी बोलते, तिचे कौटुंबिक जीवन, इतरांशी असलेला तिचा भाषाव्यवहार ह्या गोष्टींचाही त्यात समावेश आहे. शिक्षण घेण्याअगोदरची सावित्रीबाईंची भाषा, शिक्षण घेतल्यानंतरची त्यांची सुधारलेली भाषा, आपल्या पतीला 'शेटजी' म्हणण्याची लकब ह्या सर्व बारीकसारिक गोष्टींचा कादंबरीकाराने अभ्यास केलेला दिसतो.

''आऊबाईंनी सांगितलं, ते पटलं न्हाई जणू ?

मग आता एवढा कशाचा विचार करता ? गेले काही दिवस कुठं गेला न्हाई ते''[१४], अशी भीत-भीत आपल्या पतीशी बोलताना वापरलेली भाषा शिक्षणाअगोदर सावित्रीबाईंच्या तोंडी दिसते. शिक्षण घेतल्यानंतर, शिक्षणाचे महत्त्व कळल्यानंतर बदललेली भाषा पुढीलप्रमाणे येते :

''बंधूंनो, मी माझ्या धाकट्या बहिणींना शिकवण्याचं पवित्र काम करीत आहे. तुमच्या या कृत्यापासून मी एवढीच शिकवण देते की, अशीच आपल्या बहिणींची सेवा करीत राहावं. बंधूंनो, मी माझं कर्तव्यच करीत आहे. ते करताना अंगावर पडणारे हे दगड मला फुलासारखे वाटतात. ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो.''[१५]

एवढा त्रास सहन करूनही सहनशीलता व्यक्त करणारी भाषा सावित्रीबाईंच्या तोंडी जशी दिसते, तशीच कणखरपणा व्यक्त करणारीही दिसते. पुढील उद्गार पहा :

''आणि आपल्या मदतीवाचून राहिलं आहे, असंचना-अंगाला शेक लागू न देता व्होईल तेवढं करायचं आणि सुधारक म्हणून मिरवायचं, एवढंच त्यांना हवं आहे. बोलायला अघळ-पघळ आणि करायला टंगळ-मंगळ''[१६]

''सरकारनं तसा कायदाच करावा,'' सावित्रीबाई ठासून म्हणाल्या.''[१७]

''दिवसाउजेडी जी स्त्री बाहेर पडायला तयार नाही, ती आपल्या घरी येऊन राहील, असं वाटत नाही, शेटजी.''[१८]

शिक्षण घेतल्यानंतर त्यांचे झालेले मतपरिवर्तन, दिसलेला समाजातील ढोंगीपणा, कायद्याची आलेली जाण ह्या सर्व गोष्टींची जाणीव त्यांच्या भाषेद्वारे येत राहते. तसेच म.फुले ह्यांच्या शेवटच्या क्षणी सावित्रीबाईंनी काढलेले करुण उद्गार हृदयाला पाझर फोडतात. शेवटच्या क्षणापर्यंत त्यांची काळजी घेणारी सावित्रीबाई आपणास दिसून येते. कादंबरीच्या शेवटी कादंबरीकाराने सावित्रीबाईंच्या तोंडी करुणरस निर्माण करणारी भाषा वापरून म.फुले ह्यांचा शेवटचा क्षण आपल्या डोळ्यासमोर उभा केला आहे. पुढील उद्गार कसे हृदयाद्रावक आहेत पहा :

''शेटजी, तुम्ही शांतपणे झोपा. आमची काळजी करू नका...... शेटजी, आता या जगात माझं कोण आहे ?''[१९]

त्यांच्या प्रेमाचा, सोबतीचा आता शेवट होणार होता. शेवटच्या क्षणापर्यंत सावित्रीबाईंची म.फुल्यांना साथ होती. पण आता पुढील आयुष्यात सावित्रीबाईंना कोणाची साथ नव्हती, आधार नव्हता मन हेलावून टाकणारी भाषा येथे कादंबरीकाराने योजिली आहे.

**६.३.३ गोविंदराव फुले ऊर्फ दादा ह्यांच्य तोंडचे संवाद :**

म.फुले ह्यांच्या कार्यात त्यांच्या घरातीलच लोकांनी, विशेषत: त्यांच्या वडिलांनी विरोध केला. विरोध करायचा म्हणून किंवा ते कार्य त्यांना आवडत नव्हते म्हणून नव्हे, तर तत्कालीन समाजच असा होता की, त्यांना तो विरोध करावा लागला. शेवटी समाजात त्यांना रहावे लागत होते. त्यांचे मन ह्या क्रांतिकारक कार्यास तयार होत नव्हते. पुरोगामी विचारातच ते जखडून जात होते. बायकांनी लिहिणे वाचणे ही बाब त्या काळी समाजाला रुचण्यासारखी नव्हती. दादा म्हणतात,

"बायकांनी लिवायला शिकनं धर्माच्या इरुध्द हाय. तू देवाधर्माच्या इरूद्ध का जातोस ?.....

तू मात्र वाईट कर. देवाधर्माच्या इरुध्द जा."[२०]

ह्या त्यांच्या उद्‌गारांमधून त्यांची एकूणच मानसिकता दिसून येते.

**६.३.४ आऊच्या तोंडचे संवाद :**

म.फुले ऊर्फ तात्या ह्यांची मावस बहीण आऊ ही तात्यांच्या कार्यात सतत मदत करीत राहिली. दादांचे व तात्यांचे भांडण होते, तेव्हा विद्येचे महत्त्व दादांना पटवून देताना ती म्हणते,

"जोती खरं तेच सांगतोय, दादा. विद्या घेणं आणि विद्या देनं हे पुन्याचं काम हाय. बामनी कावा जोतीनं वळखला, तसा आपुनबी वळखाय पाहिजे. तू ज्या क्रिश्नाजी कारकुनाच्या सांगण्यावरून जोतीची शाळा थांबवलीस, तो त्याचा कावाच हुता. नव्हं का ?

तुझा पोरगा शिकला असता तर त्याला हिसाबात घसके कसे मारता आले असते ? तवा त्यानं भरवलं तुझ्या मनात, पोरगा कशाला शिकवतोस म्हणून''[२१]

आऊच्या ह्या भाषेवरून जाणवते की, आऊला शिक्षणाची आवड होती व समाजातील ढोंगीपणाची पूर्ण जाणीव झाली होती.

अजूनही इतर अनेक व्यक्तिरेखा आहेत की ज्यांची मानसिकता, ज्यांचा स्वभाव त्यांच्या संवदांमधून कादंबरीकाराने व्यक्त केला आहे.

## ६.४ अजून काही निरीक्षणे :

कादंबरीचा भारदस्तपणा वाढविण्यासाठी कादंबरीत आपल्या स्वत:च्या कल्पनाशक्तीने, प्रतिभाशक्तीने, कादंबरीकाराने प्रसंगाला साजेल असा कलाविष्कार भाषाशैलीद्वारे केला आहे. त्यासाठी त्याने स्वत: आपल्या निवेदनशैलीत तसेच कादंबरीनायकाच्या तोंडी, कादंबरीतील इतर व्यक्तिरेखांच्याही तोंडी म्हणी, वाक्‌प्रचार, संस्कृतप्रचुर वाक्ये, सुभाषिते तसेच ग्रामीण बोलीचा ढंग असलेली भाषा, काही ठिकाणी असलेली वातावरणाला अनुकूल भाषा, इंग्रज अधिकाऱ्याची भाषा, हिंदी भाषा ह्यांचाही वापर केला आहे. ह्या सर्व गोष्टीमुळे कादंबरीत त्यातील वातावरणाला साजेसे गांभीर्य व प्रसंगांशी समरसता निर्माण झाली आहे.

काही सुधारक फक्त बोलकेच सुधारक होते. कृती मात्र शून्यवतच होती. हे दाखवून देण्यासाठी स्वत: कादंबरीनायक जोतीराव म्हणतात, ''विष्णुपंताचा अनुभव मी अजून विसरलो नाही. तात्यासाहेब बोलायला अघळ-पघळ, करायला टंगळ-मंगळ'' (पृ.७७) कादंबरीकाराने तत्कालीन समाजाचा चौकस बुध्दीने अभ्यास केलेला जाणवतो. तत्कालीन समाजात असलेल्या शिक्षणाविषयीच्या गैरसमजाचे दर्शन पुढील म्हणीतून घडते : 'मागता येत नसेल भीक, तर पंतोजीपणा शीक' (पृ.९६) आपल्याच जातीत जन्मला असून आपल्या लोकाविरुध्द बोलतो किंवा आपल्याच लोकात राहून त्यांच्याविरुध्द शिक्षण देतो, हे

आपल्या समाजाला आवडणार नाही. कारण शिक्षण घेणे-देणे फक्त ब्राह्मणांना जमते; असे मत ब्राह्मणांचे होते. म.फुल्यांच्या सहकारी मित्रांनीच जे स्वत: ब्राह्मण असून शिक्षणाचे कार्य केले, तेही समाजातील खालच्या समजल्या जाणाऱ्या वर्गातील लोकांसाठी, परंतु जोतिरावांची शिक्षण देण्याची पद्धत (वैचारिक स्वरूपाची, व्यावहारिक ज्ञानाची ) ही त्यांच्या मनाला पटली नाही, तेव्हा सदाशिवराव (म.फुले ह्यांचे मित्र) आपल्या मित्राला-मोरोपंतांना म्हणतात, ''आपली अवस्था कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशी होईल.''(पृ.१०९) ह्या म्हणीबरोबरच कादंबरीकाराने वाक्प्रचाराचा वापर करून कादंबरीतील प्रसंग ठळकपणे उभे केलेले आहेत. शेतकरी वर्गाला भूलथापा देऊन नाडणाऱ्या वैजनाथ भट ह्या पेशवाईतील भटावरून पडलेली शिवीच आजही प्रसिध्द आहे. 'तुझ्या कामात भट पडो' (पृ.३३). कुठलेही काम व्यवस्थितपणे न होता, त्यात अडथळे निर्माण व्हावेत म्हणून त्यावेळी लोक म्हणत 'तुझ्या कामात भट पडो' ह्या वाक्प्रचाराचा वापर करून, भट लोक गरीब जनतेला कसे छळत होते आणि आताही कसे छळतात, ते लक्षात येते. समाजातील सुधारकांचे सुधारणा करण्यामागचे विचार म.फुले जाणून होते. रावसाहेब रानडे पुनर्विवाहाबद्दल पाठबळ देत होते. परंतु स्वत:च्या विधवा बहिणीचा पुनर्विवाह करण्यास त्यांचे मन तयार होत नव्हते. म.फुले ह्यांना हे खटकले. म्हणून ते ते सावित्रीबाईंना म्हणाले, ''त्यांना सुधारणा हव्या आहेत. पण त्या लोकांनी केलेल्या हे स्वत: 'उंटावरून शेळ्या हाकणार'' (पृ.१८१). म.फुल्यांनी प्रथमच एक शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंना तयार केले. त्यावेळेस कर्मठ सनातन्यांच्या नगरीत राहून त्यांना हे कठीण काम करावे लागणार होते. म्हणून 'ही एक नवीन बिलामत सावित्रीबाईंच्या अंगावर पडली होती' (पृ.३७), असे स्वत: कादंबरीकार आपल्या निवेदनात म्हणतो. सामाजिक सुधारणा गोगलगाईच्या गतीने होत होत्या. म्हणजे मंद गतीने म्हणून केशवराव (केशवराव भवाळकर सरकारी शाळेतील पंतोजी, सावित्रीबाईंना ज्यांनी शिक्षण दिले) म्हणतात, ''सामाजिक

सुधारणा अशा गोगलगाईच्या गतीनंच व्हायच्या, जोतीराव.'' (पृ.७७) परंतु ह्याच सामाजिक कार्यासाठी जेव्हा एखादी व्यक्ती आपले सर्व आयुष्यच वाहते, तेव्हा तिच्या कार्याचा कुणीतरी गौरव करणारे असतेच. त्यातील काही विद्यार्थी (म.फुले ह्यांच्या शाळेत शिक्षण घेणारे) म.फुले ह्यांच्या गौरवप्रसंगी जो इंग्रजाने त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल केला. तेव्हा त्या गौरवप्रसंगी अंग मोडून काम करीत होत. (पृ.९०). राजकीय संघर्षात भूमिगत झालेले राघोजी (इंग्रजांशी बंड करणारे, उमाजी नाईकाचा मुलगा) स्वातंत्र्यासाठी टोपीवाल्यांना झुकांड्या देत रानोमाळ पळतोय्. (पृ.६५). स्वातंत्र्यासाठी लढणारे जेथे होते, तेथेच आपल्या स्वार्थासाठी धर्मग्रंथ लिहून ठेवणारेही होते. जोतीराव गौरवाचे आमंत्रण देण्यास आलेल्या इंग्रज मेजरला म्हणतात, ''मतलबावर डोळा ठेवून त्यांनी धर्मग्रंथ रचले आहे.''(पृ.८९)

संस्कृतप्रचुर शब्दरचना व सुभाषिते ह्यांचाही वापर कादंबरीकाराने केलेला दिसून येतो. कादंबरीकाराने जोतीरावाच्या मनातील विचारांचे चक्र जाणून घेतले होते व त्यावेळीच निवेदनात त्यांनी असे म्हटले की, ते जोतीराव यांच्या डोक्यात चालू होते. 'ब्राह्मणो मम दैवतम्' (पृ.२७) ब्राह्मणांना पूज्य मानणाऱ्या लोकांना ब्राह्मणांचे खरे स्वरूप दाखवून देण्यासाठी शिक्षण देणे महत्त्वाचे आहे.

सावित्रीबाईंच्या सखोल ज्ञानाची पातळी आपल्याला दिसून येते, ती पुढील सुभाषितावरून पृथिव्यांत्रीणि रत्नानि जलं अन्न सुभाषितम् । मुढै पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञाविधियते ॥ (पृ.१०६). नाटकाच्या शीर्षकावरून त्यांच्या हे पटकन तोंडी आलेले सुभाषित आहे. कादंबरीत वातावरण जिवंत उभे करण्यासाठी निसर्गाचे वर्णन अगदी हुबेहूब केलेले दिसते. उदा. दुष्काळचे वर्णन पहा : ''शेताशेतात उभी असलेली कोवळी रोपं पावसाची वाट पाहत ताटकळत होती चढत्या उन्हात त्यांच्या माना मलुल होऊन खाली झुकल्या होत्या. आभाळात कुठही पावसाचं चिन्ह दिसत नव्हतं. . .

झाडाचं पान हलू नये, अशा जड हवेत उष्मा कोंडला होता. अंगाची तलखी होत होती. अपुऱ्या पावसामुळ जमीन जणू उष्ण उसासे टाकत होती. तिच्या पोटातली आग उष्ण वाफा होऊन बाहेर पडत होती.'' (पृ.२३५)

''टुमचे बरोबर आहे. परंतु हा प्रश्न धार्मिक आहे. नेटिव्ह लोकांच्या प्रश्नात ढवळाढवळ करायची नाही, असे आम्हाला सरकारी हुकूम आहेत.'' (पृ.३२४) (इंग्रज अधिकाऱ्याची भाषा म.फुले जेव्हा देवदासी लग्नप्रकरणाबाबत त्याच्याकडे गेले, त्यावेळेस त्याच्या बोलण्याची पध्दत त्याचा 'त' चा उच्चार 'ट' असा होणे.)

''जी तात्यासाब, मैं पान बेचनेवाला तंबोली हूँ। यहाँ वेताल पेठ में रहता हुँ''(पृ.३५९).

..... माफ कीजिए। मुझे ये बात मालूम नहीं थी। तात्यासाहब, हम भी लिखना-पढना जानते है। उनकी इन हरकतों कों हम अखबार में छपवाकर दुनिया के सामने रख देंगे। (पृ.३६१) (मुस्लीम तांबोळी जो म. फुले ह्यांच्याकडे तांबट लोकांबद्दल तक्रार करण्यास आला होता, त्याची हिंदी भाषा). ''तुमी म्हणता, आपल्या मराठी भाषेत प्रारथना केली, तरी ती देवाला पोचते. पन आपली मराठी देवाला कशी कळणार ? देवाची भाषा तर संस्कृत हाय नव्हं ?'' (पृ.२०४). (शेतकऱ्यांची ग्रामीण ढंगाची भाषा).

कादंबरीकाराने आपल्या निवेदनशैलीबरोबर प्रत्येक व्यक्तिरेखा तिच्या भाषेसह आपल्यासमोर उभी केलेली आहे. इंग्रज अधिकाऱ्याची व मुस्लीम तांबोळीची भाषा, तसेच ग्रामीण ढंगाची भाषा, ह्या सर्वच गोष्टींचा अभ्यास त्यातून दिसून येतो. कादंबरीकाराने आपल्या भाषाशैलीने कादंबरी नटवित असताना 'खबरवार्ता', 'वर्दी', 'बिलामत' अशा प्रकारचे उर्दू-फारसी शब्दही वापरले आहेत.

## <u>६.५ समारोप</u> :

अशा प्रकारे ह्या पाचव्या प्रकरणामध्ये आपण कादंबरीकाराची निवेदनाची भाषा व चरित्रनायक व इतर व्यक्तिरेखा ह्यांच्या तोंडच्या संवादाची भाषा ह्यांचा विचार केला. भाषेवरून संबंधित व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व लक्षात येते. कादंबरीकाराने म.फुले ह्यांचे समग्र जीवन उभे करताना वाचकांच्या मनाची पकड घेतली आहे. कादंबरीची भाषा सहजसुंदर, ओघवती व काळाशी संवाद साधणारी अशी आहे. चरित्रनायकाची भाषाशैली रुक्ष, विचारजड होऊ नये, ह्याची कादंबरीकाराने काळजी घेतली आहे. ह्या भाषाशैलीमुळे कादंबरीकाराने सहजपणे वाचकांना समरस करून घेतले आहे. म.फुले ह्यांचे क्रांतिकारक विचार वाचकांवर, पर्यायाने समाजावर बिंबवण्यात कादंबरीकार यशस्वी झाला आहे. प्रसंगांना अनुरूप अशी भाषाशैली वापरून त्याने तत्कालीन काळ व वातावरण जिवंत केले आहे.

आता पुढील सातव्या प्रकरणात 'महात्मा' ह्या कादंबरीचे महत्त्व आपण जाणून घेणार आहोत.

# संदर्भ


१. ठाकूर रवींद्र, 'महात्मा' (महात्मा जोतिराव फुले ह्यांची चरित-कहाणी), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती : आक्टोबर १९९९, पृ. १

२. तत्रैव, पृ. २२

३. तत्रैव, पृ. ११४

४. तत्रैव, पृ. २०

५. तत्रैव, पृ. २०

६. तत्रैव, पृ. २०

७. तत्रैव, पृ. २१

८. तत्रैव, पृ. ८९

९. तत्रैव, पृ. १४१

१०. तत्रैव, पृ. १४१

११. तत्रैव, पृ. १४५

१२. तत्रैव, पृ. ५९

१३. तत्रैव, पृ. ४४९

१४. तत्रैव, पृ. ३५

१५. तत्रैव, पृ. ५५

१६. तत्रैव, पृ. १३७,१३८

१७. तत्रैव, पृ. १०१

१८. तत्रैव, पृ. २१९

१९. तत्रैव, पृ. ४४८

२०. तत्रैव, पृ. ४७

२१. तत्रैव, पृ. ४७